। शुक्रवार, २५ डिसेंबर २०१५ पुण्यनगरी

# अपंगांनाही स्वातंत्र्य असणे गरजेचे - नसिमा हुरजूक

**दोडामार्ग / प्रतिनिधी :**

अपंगांना स्वावलंबी बनविण्यासाठी लढत असून प्रत्येकाचे स्वप्न साकार करण्यासाठी झटायचे, अपंगांनादेखील स्वातंत्र्याने जगू देणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन लक्ष्मीताई सीताराम हळबे महाविद्यालयाच्या माय-लेक स्नेहमेळाव्यात नसिमा हुरजूक यांनी व्यक्त केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात महिला विकास कक्षातर्फे लेक लाडकी अभियानांतर्गत माय-लेकीचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात प्रमुख मार्गदर्शिका म्हणून हेल्पर्स अॅण्ड डेव्हलमेंन्ट ग्रुपच्या अध्यक्षा नसिमा हुरजूक बोलत होत्या. ज्या स्वतः अपंग असून स्वावलंबी बनून इतर अपंगांना स्वावलंबी बनविण्यासाठी कार्यरत आहेत. आतापर्यंत देशपातळीवरील ७१ पुरस्कार प्राप्त केले असन घरोंदा वसतिगृहात अपंग मुलांना आधार देतात अन् स्वावलंबी बनवितात.

दोडामार्ग महाविद्यालयात त्याची प्रेरणा घेऊन माय-लेकी स्नेहमेळाव्यात त्यांना निमंत्रण देण्यात आले होते. यावेळी प्रा. व्ही. ए. पाटील, बाबूराव धुरी, विवेकानंद नाईक, सूर्यकांत परमेकर उपस्थित होते. पुढे बोलताना हुरजूक म्हणाल्या, अपंगांच्या आयुष्यातील दुःखाचा ठसा मिटवायचा अन् आत्मविश्वासाने जगण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करणे आवश्यक आहे. अपंग असूनही



मायलेकी स्नेहमेळाव्यात मार्गदर्शन करताना नसिमा हुरजूक. (छाया : भूषण सावंत)

स्वावलंबनासाठी घरोंदा वसतिगृहात काजू प्रक्रिया राबवून विक्री केली जाते. नुसत्या काजू-बांबू पिकावर सिंधुदुर्ग श्रीमंत होऊ शकतो. त्यामुळे स्वावलंबी बना, अपंग स्वावलंबी बनू शकतात, तर आपण का नाही? घेण्यापेक्षा देण्यात आनंद आहे. त्यामुळे इतरांना सहकार्य करा, असे आवाहन केले. यावेळी तालुक्यातील उद्योजक माधुरी गायकवाड, सुजन गवस, काजू व्यावसायिक याचा कर्तबगार स्त्री म्हणून एकच कन्या अन् कुटुंबनियोजनसाठी श्रावणी सावंत, वसुंधरा गवस, वैशाली गवस, तर कुडासे येथील सुविधा गवस या अपंग मुलीचा नसिमा हुरजूक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आले. तसेच विद्यार्थिनीचा भाऊबीज निधी ५००० अन् प्रवीण गवस यांनी २००० रक्कम अपंगांसाठी हेल्पर्स ग्रुपला प्रदान केली. सूत्रसंचालन किरण नाईक यांनी, आभार भाग्यश्री गवस हिने मानले.